| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/सिआर | दिनांक २३.०३.२०२० |

प्रति,

सह-जिल्हा निबंधक वर्ग-१,
व मुद्रांक जिल्हाधिकारी, नांदेड

**विषयः**- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याबाबत.
(दुय्यम निबंधक कार्यालयातील सर्व प्रकारचे दस्त नोंदणी बंद करणे बाबत)

**संदर्भः**-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२० .

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

तसेच, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे, त्या आधारे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून **आपल्या अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक कार्यालयात होणारे सर्व प्रकारचे दस्त नोंदणीचे काम दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत संपुर्णतः बंद ठेवण्यात यावे.**

वरील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी आपली राहील त्याबाबत वेळोवेळी पहाणी करुन अहवाल सादर करावा.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) पोलीस अधीक्षक, नांदेड
२) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
३) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**